महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
महाराष्ट्र शासन उपक्रम (CIN : U40100MH2005SGC153648)
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी ०२२-६९४२५००० website: www.mahagenco.in Email ID- apoclaims@mahagenco.in.

क्र.महानिर्मिती/TDS/मासं-देयके/ 08936 दिनांक: 06 OCT 2026

# परिपत्रक

**प्रति,**
मुख्य कार्यालय/सर्व क्षेत्रिय कार्यालय,
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित.

**विषय:** मुख्य कार्यालय येथे आयकर TDS भरणा व एकत्रित TDS विवणपत्रे दाखल करण्याचे केंद्रीकरणाबाबत.

**संदर्भ:** १) का.टि.क्र.CGM (Accts)/२०२६-२७/ दि.०५.०५.२०२६
२) का.टि.क्र.CGM (Accts)/२०२६-२७/४० दि.२२.०७.२०२६
३) श्री.व्ही.आर.मंत्री, कर सल्लागार यांचे दि.२२.०७.२०२६ रोजीचे मत.
४) महाव्यवस्थापक (लेखा) यांची कार्यालयीन टिप्पणी दि.०३.०८.२०२६

---

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येत आहे की, संदर्भिय क्र.४ महाव्यवस्थापक (लेखा) यांची दि.०३.०८.२०२६ रोजीची कार्यालयीन टिप्पणी मासं-देयके विभागास प्राप्त झाली होती.

त्याअनुषंगाने, कर सल्लागारांनी दिलेल्या सुधारित अभिप्रायानुसार तसेच, सक्षम अधिकारी यांनी प्रदान केलेल्या मंजूरीप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेला वेतन TDS संबंधित क्षेत्रीय कार्यालयांकडून त्यांच्या विद्यमान TAN अंतर्गत आयकर विभागाकडे जमा करण्यात येईल. तसेच, तिमाही-२ (जुलै २०२६ ते सप्टेंबर २०२६) साठीचे वेतन TDS विवरणपत्र संबंधित क्षेत्रीय कार्यालयांकडून त्यांच्या विद्यमान TAN अंतर्गत कर सल्लागार श्री. व्ही.आर.मंत्री यांच्यामार्फत दाखल करण्यात येईल.

२. कर वर्ष २०२६-२७ च्या तिमाही-३ पासून, म्हणजेच ऑक्टोबर २०२६ पासून, सर्व क्षेत्रीय कार्यालयातील वेतन TDS चे केंद्रीकरण एकाच टप्प्यात लागू करण्याकरीता ऑक्टोबर २०२६ पासून पुढील कालावधीसाठी सर्व क्षेत्रिय कार्यालयातील महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांचा TDS विषयक कामाचे केंद्रीकरण सांघिक कार्यालयामार्फत करण्यात येईल.

सदर परिपत्रक https://esevarth.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

5/10/26

**(धनाजी तोरस्कर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर :-**
संचालक (वित्त), महानिर्मिती, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई-५१.